CMYK



आज
डॉ.बाबासाहेब
आंबेडकर
यांची जयंती

महामानव भारतरत्न
डॉ.बाबासाहेब आंबेडकर
यांच्या जयंतीनिमित्त
त्यांच्या स्मृतीस
विनम्र अभिवादन

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । सोमवार, दि. १४ एप्रिल २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १९५ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## नरखेड येथे तलवारीने मारहाण

✔ **सोलापूर :** नरखेड (ता.मोहोळ) येथे तलवार आणि लाकडाने केलेल्या मारहाणीत अनिल रामराया काळे (वय ३६ रा.नरखेड) हा जखमी झाला. ही घटना शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्याला मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. समीर उद्धव शिंदे याने मारहाण केली अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# शाह-शिंदे ‘अंदर’, फडणवीस-पवार ‘बाहर’

# काहीतरी शिजतंय, काहीतरी घडतंय!

✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

**मुंबई- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात रविवारी बंद दाराआड चर्चा झाल्याचे वृत्त आहे.विशेष म्हणजे या चर्चेच्या दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे दोन्ही नेते या बैठकीला उपस्थित नव्हते. त्यामुळे या बैठकीबाबत सस्पेन्स वाढला आहे.नाशिक आणि रायगडमधील पालकमंत्र्यांच्या नियुक्तीबाबत अजूनही निर्णय झालेला नाही. शिंदे गटाचा रोख फडणवीस यांच्यावर असून पवार हे शिंदे गटाला निधी देत नाहीत,अशी तक्रार या बैठकीत करण्यात आल्याचे सांगण्यात येते.महायुतीच्या सरकारमध्ये काही तरी शिजत असून लवकरच काही ना काही घडण्याचे संकेत मिळत आहेत.**

शाह हे महाराष्ट्र दौऱ्यावर असताना शिंदे यांनी त्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी पवार यांच्याकडे असणाऱ्या अर्थखात्याची तक्रार केल्याची चर्चा आहे. शिवसेना मंत्र्यांच्या फायली अर्थाखात्याकडून वेळेवर मंजूर केल्या जात नाहीत, अशी तक्रार शिंदे यांनी शाह यांच्याकडे केल्याची माहिती आहे. शिवसेना मंत्र्यांच्या आणि आमदारांच्या फायली अर्थखात्याकडून मंजूर होत नसल्याने आमदारांच्या विकासकामांमध्ये अडचणी येत असल्याची देखील तक्रार शिंदे यांनी शाह यांच्याकडे केल्याची माहिती आहे. याबाबत राजकिय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. यानंतर शिंदे आणि शाह यांची रविवारी देखील बंद दाराआड चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. या बैठकीतही अर्थ खात्याच्या निधीवाटपाबाबत चर्चा झाल्याची माहिती आहे.



### बैठकीनंतर सस्पेन्स वाढला

एकनाथ शिंदे आणि अमित शाह यांच्या बैठकीवेळी तिथे फडणवीस आणि पवार उपस्थित नव्हते. याशिवाय रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्रीपदाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. शाह यांनी शनिवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनील तटकरे यांच्या निवासस्थानी स्नेहभोजन केले होते. त्यानंतर ते मुंबईत आले होते. मुंबईत शनिवारी रात्री उशिरा सह्याद्री अतिथीगृह येथे शाह यांची शिंदे आणि फडणवीस यांच्यासोबत बैठक पार पडली होती. या बैठकीनंतर रविवारी पुन्हा शाह आणि शिंदे यांच्यात बैठक झाली.

### एकनाथ शिंदे नेमकं काय म्हणाले?

''आमच्यात काही धुसफूस नाही. सगळं खूशखूश आहे'', असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ''आम्ही काम करणारे लोकं आहोत. काम करणारे लोक तक्रारीचं रडगाणं गात नाहीत. आम्ही रडणारे नाही लढणारे लोकं आहोत. असेल काहीतरी तर बसून चर्चेतून सगळं सुटणार'', असं एकनाथ शिंदे म्हणाले आहेत. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीदेखील याबाबतच्या चर्चांवर काल प्रतिक्रिया दिली आहे. महायुतीत सर्व सुरळीत असल्याचा दावा अजित पवार यांनीदेखील केला होता.

### लॉटरी कुणाला लागणार?

शाह यांच्यासोबतच्या तासभर बैठकीनंतर एकनाथ शिंदे यांनी मंत्री भरत गोगावले यांना तातडीने मुंबईत बोलावून घेतले. गोगावले यांनी आपले सर्व नियोजित कार्यक्रम रद्द केले आणि ते मुंबईत आले. या घडामोडींमुळे आता रायगडच्या पालकमंत्री पदाबाबत सस्पेन्स वाढला आहे. भरत गोगावले यांना रायगडच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी मिळते की आदिती तटकरे याच पालकमंत्री होणार? याबाबत आता लवकर खुलासा होणार असल्याची शक्यता आहे.





### नाही दुर्लक्ष करणार

दोन्ही नेत्यांमध्ये तब्बल तासभर चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या भेटीत निधीवाटपावर चर्चा झाल्याचे आहे. विशेष म्हणजे या भेटीत शाह यांनी एकनाथ शिंदे यांना सकारात्मक प्रतिसाद दिलाय. ''तुम्ही महायुतीसाठी जे केले, ते दुर्लक्षित केले जाणार नाही'', असे शाह यांनी शिंदे यांना म्हटल्याची माहिती आहे.

### सगळे काही ठीक होईल

शिंदे आणि शाह यांच्यात रविवारी सह्याद्री अतिथीगृह येथे तासभर चर्चा झाली. या बैठकीत निधीवाटपासंदर्भात सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती आहे. राज्यात सगळे काही ठीक होईल, असे शाह यांनी शिंदेंना आश्वासन दिले आहे. दरम्यान, शिंदे यांनी आमच्यात कोणतीही धुसफूस नसल्याचे वक्तव्य माध्यमांसमोर केले आहे.

## वळसंग टोल नाक्याजवळ बँक कर्मचाऱ्यास मारहाण


✔ **सोलापूर :** बँकेच्या थकीत कर्ज वसुलीसाठी थांबलेल्या बँक कर्मचाऱ्यास मारहाण करून जीवे ठार मारण्याची धमकी देण्यात आली. ही घटना वळसंग टोल नाका येथे शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. याप्रकरणी वळसंगच्या पोलिसांनी छोटाहत्तीच्या ड्रायव्हरसह तिघांवर गुन्हा दाखल केला आहे.

यासंदर्भात मदारसाब पैगंबर शेख (रा. वळसंग ता. दक्षिण सोलापूर) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी राजेश पवार, राहुल गुजर पवार (दोघे रा.सांगवी ता.अक्कलकोट) आणि धर्मराज गुंजले (रा.अक्कलकोट) या तिघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. मदारसाब शेख हे शुक्रवार रात्री वळसंग टोल नाका येथे बँकेचे हप्ते न भरलेल्या वाहनाची वाट पाहत थांबले होते. रात्रीच्या सुमारास अक्कलकोट होऊन सोलापूरच्या दिशेने येणाऱ्या एमएच१२-एलटी-२०२६ क्रमांकाच्या टेंपोस अडवून त्याला बँकेच्या हप्त्याबद्दल सांगितले असता वरील तिघांनी त्यांना मारहाण करून ठार मारण्याची धमकी दिली. अशी नोंद पोलिसात झाली . हवालदार चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

## कुंभारी येथे सत्तुरने मारून खुनाचा प्रयत्न

✔ **सोलापूर :** भावाला शिवीगाळ का केली ? याचा जाब विचारण्यास गेल्यानंतर सत्तुरने हल्ला करून तरुणाचा खून करण्याचा प्रयत्न करण्यात आला. ही घटना कुंभारी (ता.दक्षिण सोलापूर) येथे ९ एप्रिल रोजी दुपारच्या सुमारास घडली.

रोहित संतोष रामपुरे (वय २३ रा.कुंभारी) असे जखमीचे नाव आहे. त्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विशाल भीमाशंकर बिराजदार आणि सोमनाथ आमसिद्ध माळी (दोघे रा.कुंभारी) या दोघाविरुद्ध खुन करण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला. जखमी रोहित रामपुरे यांचा भाऊ रोहन यास बिराजदार याने शिवीगाळ केली होती. त्याचा जाब विचारण्यासाठी दोघेजण बिराजदार याच्या घराजवळ जवळ गेले होते. त्यावेळी बिराजदार याने भावाची गचंडी पकडली. आणि तुम्हाला दोघांना खलास करतो अशी धमकी देऊन घरातील धारदार सत्तुर आणला. सोमनाथ माळी याने रोहित रामपुरे याला पाठीमागून पकडले तर बिराजदार याने प्राणघातक हल्ला केला. अशी नोंद पोलिसात झाली. पुढील तपास फौजदार कांबळे करीत आहेत.



## शिवगंगानगर येथे विवाहित तरुणीची आत्महत्या

✔ **सोलापूर :** एका १९ वर्षीय विवाहित तरुणीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना जोडभावी पेठ परिसरातील शिवगंगा नगरात रविवारी दुपारच्या सुमारास घडली. शिला रमेश पुजारी (वय १९ रा.शिवगंगा नगर) असे मयत झालेल्या विवाहितेचे नाव आहे. दुपारी एकच्या सुमारास तिने राहत्या घरातील छताच्या लाकडी वाशाला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतली होती. मयत शिला पुजारी हिचा पती एका फरशी दुकानात कामाला आहे. तिच्या पश्चात ९ महिन्याचा मुलगा, पती आणि सासरे असा परिवार आहे. या घटनेची नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली आहे. या मागचे कारण समजले नाही.



## अंगावर कार घालून खुनाचा प्रयत्न: नातेपुते येथील घटना; एकावर गुन्हा

✔ माळशिरस/प्रतिनिधी

भाच्झयाला मारहाण केल्याच्या रागातून ठेकेदाराच्या अंगावर दोन वेळा मोटर घालून खुनाचा प्रयत्न करण्यात आला. ही घटना नातेपुते (ता.माळशिरस) येथील शिंगणापूर पाटी जवळ शुक्रवारी रात्री आणि शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. याप्रकरणी नातेपुतेच्या पोलिसांनी प्रवीण हरिदास बागनवर (रा.लांडगेमळा, सदाशिवनगर) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



शंकर उर्फ शाखा दत्तात्रय करचे (वय २९ रा. पिंपरी, ता.माळशिरस) असे जखमीचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून प्रवीण बागनवर यांच्याविरुद्ध खुनाचा प्रयत्न आणि गंभीर जखमी करणे या अधिनियमाप्रमाणे पोलिसांनी गुन्हा दाखल केला. शंकर करचे हे शुक्रवारी रात्री अकराच्या सुमारास शिंगणापूर पाटी येथील जयनिला हॉटेलमध्ये बसले होते. त्यावेळी प्रवीण बागनवर हा त्याच्या भाच्यास करचे याच्या मित्राने मारहाण केल्याच्या कारणावरून त्याच्या अंगावर होंडाई मोटर वेगाने ३ वेळा घालून खुनाचा प्रयत्न केला. त्यावेळी करचे हे बाजूला उडी मारून पळून गेले होते. हा प्रकार घडल्यानंतर परत दुसऱ्या दिवशी करचे हे त्यांच्या सदाशिवनार येथील भूमी इन्फ्रास्ट्रक्चर या ऑफिसमध्ये बसले होते. त्यावेळी आरोपी बागनवर याने सकाळी पुन्हा तीच मोटर घेऊन वेगाने कार्यालयात घुसवली. त्यात ऑफिस मधील आकाश बजबळकर हा कामगार गंभीर जखमी झाला. शिवाय मोटर घुसल्याने कार्यालयाचे आर्थिक नुकसान झाले. यानंतर शंकर करचे यानी नातेपुते पोलिसात फिर्याद दाखल केली. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक परजणे करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




म्हणजे आमचे ‘सुगीचे दिवस’ येणार!

# महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनी गूड न्यूज

# देशाच्या सरन्यायाधीशपदी पुन्हा महाराष्ट्राला बहुमान

✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

**सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश संजीव खन्ना हे पुढील महिन्यात निवृत्त झाल्यानंतर पुढील सरन्यायाधीश कोण होणार याविषयीची विधी क्षेत्रात उत्सुकता होती परंतु हा मान पुन्हा मराठी माणसाला मिळाला असून विशेष आनंदाची बाब म्हणजे हे नवे सरन्यायाधीश आंबेडकरी चळवळीतील एका नेत्याचे सुपुत्र आहे. सोमवारी सर्वत्र महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी ही एक राज्यासाठी गूड न्यूज असेल.**

## न्या.भूषण गवई पुढच्या महिन्यात या पदावर विराजमान होणार

### वैयक्तिक जीवन

भूषण रामकृष्ण गवई यांचा जन्म आर.एस. गवई आणि कमला यांच्या पोटी झाला. त्यांचे वडील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) गटाचे नेतृत्व करत होते, माजी खासदार आणि राज्यपाल होते. त्यांचे भाऊ राजेंद्र गवई हे देखील एक राजकारणी होते. त्यांचे कुटुंब डॉ. आंबेडकरांपासून प्रेरित आहे.



### सुरुवातीचे जीवन आणि कारकीर्द

गवई यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९६० रोजी अमरावती येथे झाला आणि ते १६ मार्च १९८५ रोजी बारमध्ये सामील झाले. त्यांनी बारसोबत काम केले. त्यांनी १९८७ ते १९९० पर्यंत मुंबई हायकोर्टात स्वतंत्रपणे वकिली केली. १९९० नंतर, त्यांनी प्रामुख्याने मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठासमोर वकिली केली. त्यांनी संवैधानिक कायदा आणि प्रशासकीय कायद्यातही वकिली केली.

**ऑगस्ट १९९२ ते जुलै १९९३ या काळात त्यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सहाय्यक सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी वकील म्हणून नियुक्ती झाली. नंतर १७ जानेवारी २००० रोजी त्यांची नागपूर खंडपीठात सरकारी वकील आणि सरकारी वकील म्हणून नियुक्ती झाली. १४ नोव्हेंबर २००३ रोजी त्यांना उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून बढती देण्यात आली.**

### सहा महिन्यांचा कालावधी मिळणार

गवई यांची सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी २४ मे २०१९ मध्ये नियुक्ती झाली होती. आता ते १४ मे रोजी सरन्यायाधीश पदाची शपथ घेतील. तर २३ नोव्हेंबर २०२५ ला निवृत्त होतील. त्यामुळे सरन्यायाधीश म्हणून त्यांना सहा महिन्याचा कार्यकाळ मिळेल. न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई हे एक भारतीय कायदेतज्ज्ञ आणि सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश आहेत. ते राष्ट्रीय कायदेशीर सेवा प्राधिकरणाचे पदसिद्ध कार्यकारी अध्यक्ष आहेत .

सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ न्यायमूर्ती भूषण गवई हे ५२ वे सरन्यायाधीश होणार आहेत. १३ मे रोजी राष्ट्रपती द्रोपती मुर्मू ह्या गवईंना सरन्यायाधीश पदाची शपथ देतील.सरन्यायाधीशपदी पुन्हा एकदा मराठी माणसाला बहुमान मिळाल्याने मराठी जनतेची मान उंचावली अड्डाहे. भूषण गवई यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९६० रोजी अमरावती येथे झाला. १९८५ मध्ये त्यांनी वकिलीची सुरुवात केली. त्यांनी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दिवंगत बारिस्टर राजा एस. भोसले यांच्यासोबत काम केले आहे.

गवई परिवाराला आंबेडकरी चळवळीचा वारसा आहे. भूषण गवई यांचे वडील रामकृष्ण गवई आंबेडकर चळवळीतील सक्रिय नेते होते. राज्यसभेचे खासदार तसेच केरळ आणि बिहारचे राज्यपाल म्हणून देखील त्यांनी काम पाहिले आहे. गवई यांनी मुंबई उच्च न्यायालयात वकिली केली. नंतर ते नागपूरला गेले. नागपूर महानगरपालिका, अमरावती महानगरपालिका आणि अमरावती विद्यापीठासाठी स्थायी वकील म्हणून त्यांनी काम पाहिले. ऑगस्ट १९९२ ते जुलै १९९३ या कालावधीत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सहाय्यक सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती होती. जानेवारी २००० मध्ये नागपूर खंडपीठासाठी त्यांची सरकारी वकील म्हणून नियुक्त करण्यात आली होती.१४ नोव्हेंबर २००३ रोजी मुंबई उच्च न्यायालयात अतिरिक्त न्यायाधीश म्हणून पदोन्नती. १२ नोव्हेंबर २००५ रोजी कायम न्यायाधीश म्हणून नियुक्ती.

CMYK